# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२२३
०२०—२५६०१३५३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:— अंगुसिक/एआयएसएचई/ 198 दिनांक — ०६/०८/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

**विषय — संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी अखिल भारतीय शिक्षा सर्वेक्षण प्रणाली (A.I.S.H.E.) मध्ये नोंदणी करणेबाबत.**

**संदर्भ — मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून दि. ०१ ऑगस्ट, २०१८ रोजी प्राप्त ईमेल.**

महोदय,

सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांना कळविण्यात येते की, दरवर्षाप्रमाणे **सन २०१८—१९** या शैक्षणिक वर्षाची माहिती ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या www.aishe.gov.in या वेबपोर्टलवर दि. **०१ ऑक्टोबर, २०१८** पासून भरावयाची आहे.

**ज्या महाविद्यालये व परिसंस्थांनी ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर अद्यापही नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालये व परिसंस्थांनी सदर नोंदणी करावयाची आहे.**

**तसेच सन २०१८—१९ मध्ये विद्यापीठाने संलंग्निकरण/मान्यता दिलेल्या नव्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर दि. ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत नोंदणी करावयाची आहे. जेणेकरून ०१ ऑक्टोबर, २०१८ पासून सुरू होणा—या ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) चे काम विहीत मुदतीत पूर्ण करणे सोयीचे होईल, याची संबंधित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी नोंद घ्यावी.**

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून सर्व संलंग्नित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर नोंदणी करून सहकार्य करावे**. यासंदर्भात काही अडचणी आल्यास अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे दूरध्वनी क्रमांक ०२०—२५६०१२२३ व ईमेल naac@unipune.ac.in वर संपर्क साधावा.

कळावे,

आपला,

6/8/18
(मुं. वि. रासवे)
सहायक कुलसचिव